खोज मास्टर न्यूज LIVE खोज हर खबर की

सायं दैनिक
# खोज मास्टर

www.khozmaster.com

अमरावती-विभाग २

khozmaster@gmail.com 8767124661 , 9657451596

बुलढाणा वाशिम यवतमाळ अकोला अमरावती १७-१ -२०२५ शुक्रवार

## आता सिंदखेडराजा मतदारसंघातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था संत चोखामेळा, राजे लखोजीराव जाधव यांच्या नावाने ओळखल्या जाणार



**देऊळगावराजा :- ( दत्ता हांडे )**आता सिंदखेडराजा मतदार संघातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था संत चोखामेळा, राजे लखुजीराव जाधव यांच्या नावाने ओळखल्या जाणार आहे. राज्य शासनाने कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यामार्फ़्रत शासन निर्णय काढून राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाची नावे बदलण्यास मान्यता दिली. त्यानुसार सिंदखेडराजा मतदार संघातील देऊळगाव राजा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत चोखामेळा तर सिंदखेडराजा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला राजे लखुजीराव जाधव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण शासनाने केले आहे. देऊळगावराजा येथील औद्योगिक संस्थेला संत चोखामेळा व सिंदखेडराजा येथील औद्योगिक संस्थेला राजे लखोजीराव जाधव नावे देण्यात यावी अशी मागणी माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे केली होती. राज्य शासनाने १५ जानेवारी २०२५ रोजी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यामार्फ़्रत शासन निर्णय काढत राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंतर्गत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत ज्या संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. अशा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा मुख्य उद्देश हा युवकांना रोजगारभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणा्या कुशल मनुष्यबळांचा पुरवठा करणे असा आहे. राज्यात ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५८५ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. ८ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने राज्यातील या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नावे बदलण्याचा विचार केला होता. याच अनुषंगाने १५ जा-नेवारी २०२५ रोजी शासन निर्णयाद्वारे राज्यातील १३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सिंदखेडराजा मतदारसंघातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत चोखामेळा यांचे जन्मस्थळ असलेल्या देऊळगावराजा तालुक्यातील संस्थेला संत चोखामेळा तर छत्रपती शिवरायांचे आजोळ म्हणून ओळखल्या जाणा्या राजे लखोजीराव जाधव यांचे नाव सिंदखेडराजा येथील संस्थेला देऊन एक प्रकारे त्यांचा सन्मानच केला असल्याचे बोलले जात आहे. माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांच्या प्रयत्नाला हे मोठे यश मानले जात आहे.

## भोकरदन येथे चित्रकला स्पर्धा उत्साहात .



**भोकरदन :- ( मुरलीधर विठ्ठल दाभाडे )** लोकमान्य सार्वजनिक वाचनालय भोकरदन तर्फ़्रे आयोजित चितकला व रंगभरण स्पर्धेत सुमारे २५०० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फ़्रुले व राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'साविती जिजाऊ जयंती सांस्कृतिक सप्ताह २०२५ अंतर्गत' लोकमान्य सार्वजनिक वाचनालय भोकरदन तर्फ़्रे रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.दिनांक ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फ़्रुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रंगभरण स्पर्धेत व दिनांक १२ जानेवारी राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धेत सुमारे २५०० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. वर्ग पहिली ते वर्ग चौथी साठी एक गट, वर्ग पाचवी ते सातवी साठी एक गट, व वर्ग आठवी ते दहावी साठी एक गट अशा तीन गटात या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील सगळे चित्र वाचनालयात बायडिंग करून पुस्तक स्वरूपात संग्रही ठेवण्यात येणार आहे.प्रत्येक गटात प्रथम येणा्या स्पर्धकास १५०१ रुपये रोख, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय येणा्या स्पर्धकास १००१ रुपये रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तर तृतीय येणा्या स्पर्धकास ५०१ रुपये रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे स्वरूप असणार आहे. बक्षीस वितरण छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी १९ फ़्रेब्रुवारी २०२५ रोजी लोकमान्य सार्वजनिक वाचनालय भोकरदन येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे. भोकरदन शहरातील जि प प्रशाला, पायोनियर इंटरनॅशनल सीबीएससी स्कूल, अक्षर ज्योती इंग्लिश स्कूल, जि. प. के. प्रा शा कन्या भोकरदन, रामेश्वर इंग्लिश स्कूल, गणपती इंग्लिश व मराठी शाळा, न्यू हायस्कूल, स्व. विलासराव देशमुख इंग्लिश स्कूल, हज्जन खातिजा उर्दू हायस्कूल, स्वामी विवेकानंद विद्यालय, प्रभात इंग्लिश स्कूल, जि प प्रा शा उर्दू नं.१, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, अलफ़्ररान इंग्लिश स्कूल, शिवा प्राथमिक शाळा आदी शाळांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी लोकमान्य सार्वजनिक वाचनालय भोकरदन येथे बक्षिस वितरण करण्यात येणार आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सहसचिव श्रीमती सुशीला श्रीराम खरात, चित्रकला शिक्षक सुभाष पवार, कुमारी अश्विनी गणेश औटी, शब्बीर शेख, चंद्रशेखर देशमुख, ग्रंथपाल कैलास साबळे आर्दीनी प्रयत्न केले. चित्रकला स्पर्धेपूर्वी लोकमान्य सार्वजनिक वाचनालयात माँ जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त अभियंता अनिल जाधव, सुरेश सपकाळ, उद्योजक सुभाष गावंडे, व पतकार रमेश इंगळे आदी मान्यवरांसह संस्थेचे अध्यक्ष विनायक औटी, उपाध्यक्ष प्राचार्य प्रकाश बाघ, कोषाध्यक्ष विजय जैन, सचिव नंदकिशोर देशमुख व संचालक कैलास पवार पाटील मान्यवर उपस्थित होते.

## देऊळगाव राजा नगर परिषदेमाफ़्रत प्रजासत्ताक दिनी सूरू होणा्या अभ्यासिकेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा ,,, मुख्याधिकारी अरुण मोकळ



देऊळगाव राजा/तालुका प्रतिनिधी

देऊळगाव राजा येथील गरजू व अभ्यासू विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा मधून शासकिय व निमशासकीय कार्यालयात उच्च पदावर नोकरी करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी देऊळगाव राजा नगर परिषदेमाफ़्रत शहराच्या मध्यवर्ती भागात चिखली महामार्गावरील

डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मोफ़्रत अभ्यासिका येत्या २६ जानेवारी पासून सुरूकण्यात येत आहे,या मोफ़्रत अभ्यासिके तस्पर्धा परिक्षेकरीता आवश्यक विविध क्षेत्रातील पुस्तके उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनापासून सुरू होत असलेल्या अभ्यासिकेत प्रवेश निश्चित करण्यासाठी जास्तीत जास्त गरजू व अभ्यासू विद्यार्थ्यांनी आपली नावे नगर परिषदेमध्ये नोंदवावी असे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक अरुण मोकळ यांनी केले आहे.

## चिखली तालुक्यातील कव्हळा येथील घटना.शेतातील तुरीची सुडी.अज्ञाताने. पेटवून दिल्याने शेतक्याचें अंदाजे ३लाखाचे नुकसान.



मन्सूर शहा खोज मास्टर न्यूज. धोत्रा. भनगोजी:--- चिखली शेतकरी कर्जबाजारी झाला असून आर्थिक संकटात आहे. त्यात सोयाबीन सह ईतर पिकांना कवडी मोल भाव मिळत आहे. शेतक्यावर कर्जाचा बोजा चढला आहे. यात अमडापूर परिसरात अज्ञाताकडून सुड्या पेटवून देवून शेतक्याच्या नुकसानीच्या घटना घडत आहेत.येथून जवळच असलेल्या कव्हळा येथे घटना घडली असून १३ जानेवारी च्या पूर्वी शेतकरी शेषराव काशीराम जाधव रा. कव्हळा या शेतक्याने भाग २ गट न. ७१२ मधील शेतात ५ एकर तुरीची सोंगणी करून सुडी लावली होती. मात्र अज्ञाताने १३ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता सुडी पेटवून देवून खाक केली आहे. यात शेतक्याचे ४० पोते तुर जळून नष्ट होत ३ लाख रुपयांचे होणा्या उत्पादनाचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. सदर शेतक्याने अमडापूर पोलीस.स्टेशनला फ़्रिर्याद दाखल केली असून, अमडापूर पोलीस तपास करत आहे. व नुकसान भरपाई मिळण्याकरिता महसूल विभागाकडे मागणी केली असून, अमडापूर येथील भाग २ तलाठी मोरे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे.यावेळी पोलीस पाटील देवानंद जाधव, मा. तंटामुक्त अध्यक्ष रतन आढाव, तंटामुक्त अध्यक्ष मोहशिंग महाले, शेतकरी गणेश शेषराव डाळीमकर, दत्तात्रय गाढवे, प्रविण इंगळे, भुषण महाले, सुनिल जाधव यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते .

## देश धर्म पर मिटने वाला शेर शिवा का छावा था...! महापराक्रमी परम प्रतापी एकही शंभुराजा था...!



धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार आणि देव, देश, धर्म यासाठी सजगता तसेच तरुण मुलीमध्ये जागृती निर्माण करणा्या प्रख्यात व्याख्याते श्री वसंतराव हंकारे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाचीची शिदोरी सर्वांनी सोबत न्यावी-- धर्मवीर आमदार श्री संजुभाऊ गायकवाड...!धर्मवीर युथ फ़्राऊंडेशनच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक! प्रेरणा, विचार, आणि संस्कार यांचा संगम घडवणा्या या व्याख्यानातून समाजाला नवी दिशा मिळेल याची खात्री आहे....!धर्मवीर आमदार श्री संजुभाऊ गायकवाड आज दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील ✻मोताळा शहरांमध्ये स्वराज्याची दुसरे छत्रपती धर्मवीर श्री संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाच्या निमित्याने धर्मवीर युथ फ़्राऊंडेशनच्या वतीने श्री वसंत हंकारे यांच्या प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे उद्घाटन बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार धर्मवीर श्री संजुभाऊ गायकवाड यांनी केले...!✻ यावेळी त्या ठिकाणी मा. नगराध्यक्ष सौ पुजाताई संजय गायकवाड, धर्मवीर युथ फ़्राऊंडेशनची संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज संजय गायकवाड, मयुरीताई मृत्युंजय गायकवाड, वसुंधराताई पृथ्वीराज गायकवाड तहसीलदार श्री हेमंत पाटील साहेब, बोराखेडी ठाणेदार श्री सारंग नवलकर, यांच्यासह धर्मवीर युथ फ़्राऊंडेशनचे तसेच शिवसेना युवासेनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, हजारो मुली, माता-भगिनी आपल्या आई-वडिलांसोबत हजर होत्या..!या कार्यक्रमात व्यक्त होण्याची संधी मला मिळाली.

## जिल्ह्यातील ८८ गावांमध्ये 'महारेशीम अभियान राबविण्यात येणार



**बुलढाणा :- ( शाहिद शहा )** जिल्ह्यातील रेशीम उद्य-ोगाच्या विकास व विस्तारासाठी जिल्हा रेशीम कार्यालयामाफ़्रत दि. ९ जा-नेवारी ते ९ फ़्रेब्रुवारी यादरम्यान जिल्ह्यातील ८८ गावांमध्ये 'महारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत दि. १४ जा-नेवारी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते रेशीमरथाचे उद्घाटन करण्यात आले. शेती उत्पन्नात वाढ करण्यासाठी शेतक्यांनी कापूस, सोयाबीन, गहू, मका, ज्वारी या पारंपरिक पिकांबरोबर रेशीम शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिका्यांनी यावेळी केले.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित रेशीम रथाच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, रेशीम विकास अधिकारी एन. बी. बावगे, जिल्हा रेशीम कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते. जिल्ह्यातील ८८ गावांत महारेशीम अभियानांतर्गत जनजागृती करण्यात येणार आहे.विहित नमुन्यातील अर्ज, जमिनीचा सातबारा व आठ अ ऑनलाइन उतारा, चतुःसीमा नकाशा, पाणी प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, मनरेगा जॉबकार्ड झेरॉक्स, रहिवासी दाखला, अल्प-भूधारक प्रमाणपत्र, आवश्यकतेप्रमाणे जात प्रमाणपत्र, मतदान कार्ड, रेशन कार्ड, ग्रामपंचायत ठराव, रुपये १०० रुपयांच्या बाँड पेपरवर करारनामा प्रत ही कागदपत्रे आवश्यक आहेत. रेशीम शेतीसाठी मनरेगा अंतर्गत तुती लागवड व कीटक संगोपन गृह बांधकामासाठी एक एकराकरिता तीन वर्षात चार लाख १८ हजार ८१५ रुपयांचे तर समग्र सिल्क-दोन योजनेंतर्गत तुती लागवड, कीटक संगोपन गृह बांधकाम, कीटक संगोपन साहित्य, सिंचन आणि निर्जंतुकीकरण औषधींसाठी एससी, एसटी प्रवर्गांना चार लाख ५० हजार रुपये व इतर प्रवर्गांना तीन लाख ७५ हजार रुपये अनुदान दिले जाते.२ तसेच समग्र सिल्क-२ योजनेंतर्गत एक एकरात तुती नर्सरी करण्यासाठी एससी, एसटी प्रवर्गाना एक लाख ३५ हजार रुपये व इतर प्रवर्गाना एक लाख १२ हजार रुपये अनुदान देण्यात येते. बाल कीटक संगोपन गृह बांधकामासाठी एससी, एसटी प्रवर्गाना ११ लाख ७० हजार रुपये व इतर प्रवर्गांना ९ लाख ४५ हजार ५०० रुपये अनुदान दिले जाते. त्यामुळे शेतक्यांना मोठा आधार होणार आहे.

## बुलढाण्यात आज निर्यातदारांसाठी कार्यशाळा

बुलडाणा, (जिमाका) दि. १७ : जिल्हा उद्योग केंद्रामाफ़्रत आज बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब येथे निर्यातदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते होणार आहे. जिल्ह्यातील निर्यातदारांनी कार्यशाळेला उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.निर्यात क्षेत्रात जागरूकता, उद्योजकता आणि शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या पुढाकाराने उद्योग विकास आणि निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत अमरावती क्षेत्राचे उद्योग सह संचालक निलेश निकम हे महाराष्ट्रातील निर्यात उपक्रमांविषयी माहिती देतील. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील बुलढाणा जिल्ह्यात सूक्ष्म, लघू आणि मध्यम (एमएसएमईएस) उद्योग वाढीची संभाव्यता आणि पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करतील. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे बुलढाणा जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीविषयी माहिती देणार आहेत. सहायक संचालक स्नेहल ढोके ह्या केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन योजनांची माहिती देतील.कार्यशाळेच्या मध्यातरानंतर सल्लागार अंकीत गुप्ता हे बुलढाणा निर्यात कृती आराखड्याविषयी माहिती देतील. डाक निर्यात केंद्राविषयी अधीक्षक जी.एन. जाधव माहिती देतील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे कृषी विभागाच्या निर्यात प्रोत्साहन योजनेविषयी माहिती देतील. कार्यशाळेच्या अंतिम टप्प्यात प्रश्नोत्तर घेतल्यानंतर समारोप करण्यात येईल. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी निर्यातदार, उद्योजकांनी https://forms.gle/झटी१टधसुनुङ५ादू७ या गुगल फ़्रॉर्मवर माहिती भरुन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.